# <u>निविदा सूचना</u>

## अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
## हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

### अध्यक्ष, राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती
### यांच्या कार्यालयासाठी मोटारवाहन खरेदी करण्याबाबत
### क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.७५/ग्रासं-२
### दिनांक: ४ डिसेंबर, २०१९

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई विभागांतर्गत अध्यक्ष, राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती यांचेसाठी टाटा मोटर्स या कंपनीच्या "टाटा हॅरिअर एक्स झेड" या मॉडेलचे "सफेद" रंगाचे वाहन खरेदी करण्यासाठी, सदर कंपनीच्या मुंबई व ठाणे या क्षेत्रातील वितरकांकडून एकूण रुपये २०,००,०००/- (रुपये वीस लाख फक्त) या मर्यादेपर्यंत मोहोरबंद निविदा (दरपत्रकं) मागविण्यात येत आहेत.

२. सदर वाहनासोबत पुढीलप्रमाणे सुट्या भागांचा (Accessories) समावेश असावा.

| TATA HARRIER ACCESSORIES | | | |
|---|---|---|---|
| 1 | 3 D MAT | 5 | REAR BUMPER GARNISH |
| 2 | TRUNK MAT | 6 | REAR ENTERTAINMENT SYS (2 PCS) |
| 3 | FOG LAMP GARNISH | 7 | SIDE FOOT STEP WITH BRACKET |
| 4 | DICKYGARNISH LOWER | 8 | DIGITAL VIDEO RECORDER |

३. सदर निविदा, "अवर सचिव (ग्रासं-२), अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२" येथे दि.११.१२.२०१९ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा पद्धतीने मोहोरबंद पाकिटातून पाठविण्यात याव्यात. विहित मुदतीनंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. निविदा पाकिटावर "अध्यक्ष (मंत्रीस्तरीय), राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती यांच्यासाठी खरेदी करावयाच्या वाहनासाठी निविदा" असा स्पष्ट उल्लेख असावा.

४. विहित वेळेमध्ये प्राप्त निविदा दि.१३.१२.२०१९ रोजी दु.३.०० वाजता श्री.मनोजकुमार सुर्यवंशी, सह सचिव, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, रुम नं.२२१, दुसरा मजला, मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२ येथे उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारकास उपस्थित राहण्याची परवानगी आहे.

५. निविदाकाराने, इसाऱ्याची रक्कम रु.५,०००/- (प्रत्येक निविदेस) कक्ष अधिकारी, रोख शाखा, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, पोटमाळा, मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२ यांच्या नावाने मुंबई येथील बँकेत वटणारा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा स्विकारण्यात येणार नाही.

६. दरपत्रकामध्ये देण्यात आलेल्या किमतीमध्ये, शासकीय वाहनास लागू असलेल्या सर्व कर व इतर शुल्क यांचा समावेश करुन **<u>अंतिम दर</u>** नमूद केलेले असावे.

७. पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर, मागणी करण्यात आलेल्या वाहनाचा पुरवठा विहित मुदतीत करणे निविदाकारावर बंधनकारक राहिल.

८. अध्यक्ष (मंत्रीस्तरीय), राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती यांच्या कार्यालयासाठी वाहनाचा पुरवठा केल्यानंतर त्यासंबंधीचे देयक आगाऊ मुद्रांक पावतीसहीत सादर करावे. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास, विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

९. निविदा सादर करताना लिफाफा सिलबंद करावा.

१०. निविदा लिफाफ्यामध्ये निविदेसोबत खालील कागदपत्रे सादर करावीत:-

१) इसारा रक्कम रु.५,०००/- (प्रत्येक निविदेस) साठी, कक्ष अधिकारी, रोख शाखा, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, पोटमाळा, मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२ यांच्या नावाने, मुंबई येथील बँकेत वटणारा, राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.),

२) आस्थापना व दुकाने अधिनियम, लायसन्स प्रमाणपत्राची प्रत,

३) निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य असलेले आयकर भरण्यासंबंधीच्या प्रमाणपत्राची प्रत/तसेच मागील तीन वर्षांची आयकर विवरणपत्रे,

४) पॅनकार्डची प्रत,

५) GST नोंदणी प्रमाणपत्र व GST भरल्याचे विवरणपत्र.

११. शासनाने निविदा स्विकृत केल्यानंतर इतर कोणत्याही कारणामुळे दरवाढ झाल्यास, निविदाकाराने सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ करुन देण्यात येणार नाही.

१२. यशस्वी निविदाकारास निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व विहित वेळेत वाहनाचा पुरवठा करण्याबाबत स्वतंत्रपणे रु.१००/- च्या बॉंड पेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

१३. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा नाकारण्याचे वा स्विकारण्याचे अधिकार मा.प्रधान सचिव (अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

१४. प्रशासकीय किंवा तांत्रिक कारणास्तव वरील निविदा सादर करावयाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो.

(सु.ज्ञा. पेडेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन